मुंबई उपनगर जिल्हा

**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी**

प्रसिद्धी माध्यम कक्ष

दूरध्वनी क्र. :- ०२२-२६४० ११५६, ई-मेल संपर्क :- mumbaisuburbanmediacell@gmail.com

जा.क्र. १३९ /प्रसिद्धी माध्यम/प्रेस नोट /२०१९, २७/०४/२०१९

प्रेस नोट

# लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मुंबई उपनगर जिल्हा प्रशासन सज्ज

## ७१ लाखांपेक्षा अधिक मतदार, तर ७ हजारांपेक्षा अधिक मतदान केंद्रे

## मतदारांनी मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्याचे आवाहन

मुंबई, २७ एप्रिल २०१९: **'लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०१९' बाबत मतदार संघ, मतदान केंद्र, मतदार संख्या व उपलब्ध भौगोलिक क्षेत्र यांचा विचार करता मुंबई उपनगर जिल्हा हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा आहे. या जिल्ह्यातील ४ पूर्ण लोकसभा मतदार संघ व एक अंशत: लोकसभा मतदारसंघ असून यात २६ विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. या जिल्ह्यात तब्बल ७१ लाख ४७ हजार ६६० एवढी मतदार संख्या आहे. या मतदारांना येत्या सोमवारी होणा-या मतदान प्रक्रियेत सहभागी होता यावे, यासाठी ७ हजार ४७२ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. या मतदान प्रक्रियेसाठी मुंबई उपनगर जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून मा. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन व्हावे, यासाठी सुमारे ६० हजार कर्मचारी कार्यरत आहेत. याव्यतिरिक्त कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस कर्मचारी, राज्य राखीव पोलीस दल व केंद्रिय औद्योगिक सुरक्षा दल यांचे जवान देखील तैनात करण्यात आले आहेत, अशी माहिती मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. सचिन कुर्वे यांनी दिली आहे.**

'लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०१९' बाबत आज मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत उपस्थितांशी संवाद साधताना जिल्हाधिकारी श्री. कुर्वे

बोलत होत. याप्रसंगी अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती वैदेही रानडे, अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती माधवी सरदेशमुख, उप जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. अजित साखरे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

'लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०१९' च्या अनुषंगाने मुंबई उपनगर जिल्हा प्रशासनाने केलेली तयारी व आतापर्यंत करण्यात आलेली महत्त्वाची कार्यवाही व कारवाई याबद्दलची ठळक माहिती पुढीलप्रमाणे आहे:

<u>**मतदार संख्येत तीन लाखांपेक्षा अधिक वाढ**</u>

मुंबई उपनगर जिल्ह्यात दि. १ सप्टेंबर २०१८ रोजी प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध झाली होती. सदर यादीनुसार जिल्ह्यामध्ये ३७ लाख २५ हजार ३२३ पुरुष मतदार, ३० लाख ९२ हजार ९४६ स्त्री मतदार; तर इतर मतदारांची संख्या ४५६ एवढी होती. यानुसार एकूण मतदारांची संख्या ६८ लाख १८ हजार ७२५ एवढी होती.

वरील अनुषंगाने मतदार व नव-मतदार नोंदणी वाढावी, यासाठी जिल्हा प्रशासनाने सुनियोजित प्रयत्न सातत्याने केले. यासाठी परिणामकारक विविध स्तरीय जनजागृती कार्यक्रम देखील राबविण्यात आले. या जनजागृती कार्यक्रमांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला. परिणामी, मतदार व नव-मतदार नोंदणी देखील मोठ्या प्रमाणात झाली. यानुसार दि. ३१ जानेवारी २०१९ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली.

त्यानंतर मतदार याद्यांच्या संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांर्गत दिनांक १० एप्रिल २०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अंतिम मतदार यादीनुसार पुरुष मतदारांच्या संख्येत १ लाख ६४ हजार ५४८ एवढी वाढ होऊन, ती ३८ लाख ८९ हजार ८७१ एवढी झाली. महिला मतदारांच्या संख्येत १ लाख ६४ हजार ३२२ एवढी वाढ होऊन, ती ३२ लाख ५७ हजार २६८ एवढी झाली. तर इतर मतदारांच्या संख्येत ६५ मतदारांची वाढ होऊन, ती संख्या ५२१ एवढी झाली.

**वरील तपशिलानुसार दि. १ सप्टेंबर २०१८ रोजीच्या प्रारुप मतदार यादीच्या तुलनेत मुंबई उपनगर जिल्ह्यातील एकूण मतदार संख्येत ३ लाख २८ हजार ९३५ एवढी वाढ होऊन ती आता ७१ लाख ४७ हजार ६६० एवढी झाली आहे.**

**<u>मतदान केंद्रे, मनुष्यबळ, यंत्रसामुग्री व प्रशिक्षण</u>**

'लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०१९' चे काम सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मुंबई उपनगर जिल्ह्यात सुमारे ६० हजार कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उपनगर जिल्ह्यात ७ हजार ४७२ मतदान केंद्रे आहेत. यापैकी मुंबई उत्तर लोकसभा मतदार संघात १ हजार ७१५ मतदान केंद्र, मुंबई उत्तर पश्चिम (वायव्य) लोकसभा मतदार संघात १ हजार ७६६, मुंबई उत्तर पूर्व (ईशान्य) लोकसभा मतदार संघात १ हजार ७२१, तर मुंबई उत्तर मध्य लोकसभा मतदार संघातील १ हजार ७२१ मतदान केंद्रांचा समावेश आहे. तर मुंबई उपनगर जिल्हयात अंशत: समावेश असणा-या दक्षिण मध्य लोकसभा मतदार संघातील दोन विधानसभा मतदारसंघातील ५४९ मतदान केंद्रांचाही यात समावेश आहे.

या सर्व मतदान केंद्रावरील मतदान प्रक्रियेसाठी एकूण ८ हजार २३२ मतदान केंद्राध्यक्ष, ८ हजार २३२ प्रथम मतदान अधिकारी, १६ हजार ४६४ इतर मतदान अधिकारी व ८ हजार २३२ शिपाई याप्रमाणे प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी ३२ हजार ९२८ एवढे कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच ४५० सूक्ष्म निरिक्षक, ७ हजार ४७४ केंद्र स्तरीय अधिकारी, १ हजार ३०० क्षेत्रिय अधिकारी, २ हजार ६०० आचारसंहिता पथके, सेंट्रल पोलिंग स्टेशन मध्ये १ हजार ९५० अधिकारी / कर्मचारी, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयासाठी ३०० अधिकारी / कर्मचारी, नोडल ऑफिसर कार्यालयांसाठी ५०० अधिकारी / कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या सर्व कर्मचारी / अधिका-यांना आवश्यक ते प्रशिक्षण वेळोवेळी देण्यात आले आहे. या सर्व मतदान प्रक्रियेसाठी आवश्यकतेनुसार इव्हीएम, व्हीव्हीपॅट व इतर यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच मनुष्यबळाची अतिरिक्त कुमक व अतिरिक्त यंत्रसामुग्रीची देखील व्यवस्था करण्यात आली आहे.

## वाहने

मतदान प्रक्रियेच्या अनुषंगाने वाहतूक व्यवस्था सुयोग्य प्रकारे व्हावी, यासाठी मुंबई उपनगर जिल्ह्यात २ हजार ९८५ वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच दिव्यांग व्यक्तींसाठी मोफत वाहन व्यवस्थेकरिता ३४४ वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे.

## सखी मतदान केंद्र

'लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९' च्या अनुषंगाने मा. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सुचनांनुसार मतदान प्रक्रियेत समाजातील सर्व घटकांना सामावून घेण्यासाठी राबविण्यात येणा-या 'स्वीप' (SVEEP) कार्यक्रमाची अधिकाधिक परिपूर्ण अंमलबजावणी मुंबई उपनगर जिल्ह्यात प्रभावीपणे सुरु आहे. याच अंमलबजावणीचा भाग म्हणून लिंगभेद निर्मूलन जाणीवजागृतीसह महिला सक्षमीकरणाच्या दिशेने सकारात्मक वाटचाल करण्यासाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातील २६ विधानसभा मतदारसंघ क्षेत्रांमध्ये मतदानाच्या दिवशी केवळ महिला कर्मचा-यांद्वारे संचालित होणारे प्रत्येकी एक मतदान केंद्र  याप्रमाणे २६ केंद्रे प्रतिकात्मक स्वरुपात उभारण्यात येणार आहेत.

## दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी स्वयंसेवक

दिव्यांग मतदार व ज्येष्ठ नागरिक यांच्या मदतीसाठी स्वयंसेवकांची व्यवस्था करण्यात आली आहे. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना मतदान करण्यासाठी प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच दिव्यांग मतदार व मतदानासाठी येणारे ज्येष्ठ नागरिक यांना मदतनीस म्हणून स्काऊट व गाईड यांची मदत घेण्यात येणार आहे.

इव्हीएम यंत्रावर ब्रेल लिपीमध्ये देखील माहिती असणार आहे, ज्यामुळे संबंधित दिव्यांग मतदारांना मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदविणे सुलभ होणार आहे. तसेच गरजुंसाठी व्हिल-चेअरची व्यवस्था असणार आहे.

'जिल्ह्यातील दिव्यांग मतदारांना मतदान प्रक्रियेत सहभागी होणे अधिक सुलभ व्हावे, यादृष्टीने मतदानाच्या दिवशी म्हणजेच २९ एप्रिल २०१९ रोजी दिव्यांग व्यक्तींसाठी मोफत वाहन सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अनुषंगाने दिव्यांग व्यक्तींची नाव नोंदणी यापूर्वीच सुरु करण्यात आली याकरिता ३४४ वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे.

या अनुषंगाने अधिकाधिक दिव्यांग मतदारांनी या सुविधेसाठी नावनोंदणी करावी व या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे करण्यात आले आहे. मोफत वाहन सुविधेच्या नोंदणीसाठी दिव्यांग मतदारांनी किंवा त्यांच्या कुटुंबीयांनी दिव्यांग मतदाराचे नाव, त्यांचा मतदार क्रमांक व लोकसभा मतदार संघ क्रमांक आदी तपशील लघुसंदेशाद्वारे (SMS) किंवा व्हाट्सऍप संदेशाद्वारे ९८६९-५१५-९५२ किंवा ८६५५-२३५-७१४ या भ्रमणध्वनी क्रमांकावर पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**<u>मतदान केंद्रांवरील सोयी सुविधांबाबत</u>**

सर्व मतदान केंद्रावर पुरुष व महिला मतदारांसाठी स्वतंत्र रांगेची व्यवस्था. प्रत्येक मतदान केंद्रावर मतदार मदत केंद्राची व्यवस्था. मतदान केंद्रावर प्रथमोपचार, पिण्याचे पाणी व शौचालय यांची सुविधांसह मतदारांच्या मार्गदर्शनासाठी माहिती फलक देखील असणार आहेत.

**<u>वेबकास्टींग</u>**

मुंबई उपनगर जिल्ह्यातील ७ हजार ४७२ मतदान केंद्रांपैकी १० टक्के मतदान केंद्रांवर वेबकास्टींग (Live Webcasting) केले जाणार आहे. यामध्ये मुंबई उत्तर लोकसभा मतदार संघात १६९ मतदान केंद्र, मुंबई उत्तर पश्चिम (वायव्य) लोकसभा मतदार संघात १८०, मुंबई उत्तर पूर्व (ईशान्य) लोकसभा मतदार संघात १७२, तर मुंबई उत्तर मध्य लोकसभा मतदार संघातील १७७ मतदान केंद्रांचा समावेश आहे. तसेच मुंबई उपनगर जिल्ह्यातील 'क्रिटिकल' मतदान केंद्र म्हणून निर्धारित करण्यात आलेल्या सर्व म्हणजे ६५ ठिकाणी वेबकास्टिंग करण्यात येणार आहे. **यानुसार**

**एकूण ७६३ एवढ्या मतदान केंद्रांवरील घडामोडींचे बेबकास्टिंग करण्यात येणार असून या माध्यमातून तेथील घडामोडींवर काटेकोरपणे लक्ष ठेवले जाणार आहे.**

**मद्य व मद्य पदार्थ जप्ती**

राज्य उत्पादन शुल्क खात्याद्वारे दि. ११ मार्च ते २६ एप्रिल २०१९ दरम्यान करण्यात आलेल्या विविध स्तरीय कार्यवाही दरम्यान १८५ प्रकरणी सुमारे १९ लाखांपेक्षा अधिक किमतीचा अनधिकृत मद्य व मद्य पदार्थ साठा जप्त करण्यात आला आहे. याच प्रकरणांमध्ये १७१ व्यक्तींना अटक करण्यात आली असून अवैध मद्यासाठी वाहतूक प्रकरणी सुमारे १४ लाख ५२ हजार ६२० किमतीची सात वाहने देखील जप्त करण्यात आली आहेत.

**मद्य विक्री प्रतिबंध (Dry Day)**

मुंबई उपनगर जिल्हयात प्रचार समाप्त झाल्यापासून म्हणजेच दि. २७ एप्रिल २०१९ रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून ते दि. २९ एप्रिल २०१९ रोजी मतदान संपेपर्यंत मद्य विक्रीवर प्रतिबंध असणार आहे.

**आचारसंहिता भंगाच्या विविध प्रकरणी १० दखलपात्र गुन्हे दाखल**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ च्या पार्श्वभूमीवर मा. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सुचनांनुसार मुंबई उपनगर जिल्हयात आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी सुरु असून दि. ११ मार्च, २०१९ ते दि. २६ एप्रिल २०१९ या कालावधीत मुंबई उपनगर जिल्हयात मुंबई उपनगर जिल्हयातील १२ हजार ५९ अनधिकृत फलक हटविण्यात आले असून १४ तक्रारी पोलिसात दाखल करण्यात आल्या आहेत. वाहनाचा दुरुपयोग व इतर प्रकरणी ६ अदखलपात्र गुन्हे तर इतर प्रकरणी १० दखलपात्र गुन्हे पोलिसात दाखल करण्यात आले आहेत.

===